Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH APRIL 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे जानेवारी सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—**

### सन १८९८ चा आक्ट १ ला.

**सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थी सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

लहान सरनामा.

१. या आक्टास, सन १८९८ चा, डांकेच्या गाड्यांचा आक्ट (१८६१) सुधारण्याबाबत आक्ट असें ह्मणावें.

सन १८६१ चा आक्ट १६, कलम १, याचा विशेष ठराव, आणि सन १८७६ चा आक्ट १६, कलम २, हीं रद्द करणें.

२. सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट, कलम १, याचा विशेष ठराव, आणि सन १८७६ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट (१८६१) सुधारण्याबाबद आक्ट, कलम २, हीं यावरून रद्द केलीं आहेत.

सन १८६१ चा आक्ट १६ याच्या ४ थ्या कलमांत नवीन वाक्य दाखल करणें.

३. सन १८६१ चा डांकेच्या गाड्यांचा आक्ट याच्या ४ थ्या कलमाचें पहिलें वाक्य यावरून रद्द केलें आहे, आणि त्याबद्दल खालील वाक्य दाखल केलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

"अशा प्रत्येक परवान्याबद्दल डांकेच्या गाडीच्या मालकानें पांच रुपयांची रकम किंवा स्थानिक सरकार ठरवील तशी त्याहून कमी रकम दिली पाहिजे, आणि तो परवाना त्याच्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील."

सन १८६१ चा आक्ट १६ याच्या २० व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

४. संदरहू आक्टाच्या २० व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

कानू करण्याचा अधिकार.

"२० अ. (१) स्थानिक सरकारास, सरकारी गझेटांत जाहीरनामा देऊन, आपल्या वहिवाटींतील मुलुकांमध्यें किंवा त्या मुलुकांच्या कोणत्याही भागामध्यें या आक्टाचीं कारणें व हेतु सिद्धीस नेण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) या आक्टाअन्वयें द्यावयाच्या परवान्यांचे नमुने, त्यांबद्दल द्यावयाच्या रकमा व ते ज्या शर्तींवर देतां येतील त्या शर्ती, व ते ज्या प्रसंगीं रद्द करतां येतील ते प्रसंग फर्माविण्याचा,

(ब) डांकेच्या गाड्यांची व त्या ओढण्याच्या कामीं लावलेल्या जनावरांची पाहणी करण्याबद्दल तजवीज करण्याचा, आणि

(क) ज्या टप्प्यांला जनावरें डांकेच्या गाड्यांस जुंपून नेतां येतील त्यांची संख्या व अंतर, आणि त्यांचें हरणीस कसें असलें पाहिजे व तीं कोणत्या रीतीनें जुपलीं पाहिजेत तें या गोष्टी ठरविण्याचा,

अधिकार आहे.

(३) या कलमाअन्वयें कोणताही कानू करतांना स्थानिक सरकारास, त्या कानूचें उल्लंघन झालें असतां पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल, असें फर्माविण्याचा अधिकार आहे."

सन १८६१ चा आक्ट १६ याच्या २१ व्या कलमानंतर जास्त कलमें दाखल करणें.

९. सदरहू आक्टाच्या २१ व्या कलमानंतर खालील कलमें दाखल केलीं पाहिजेत. तीं येणेंप्रमाणें:—

आक्टाची व्याप्ति.

"२२. हा आक्ट, त्यांत नंतरच्या आक्टांवरून केलेल्या सुधारणांसुद्धां, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील सगळ्या मुलुकास लागू होतो; परंतु तो, ज्या कोणत्याही म्युनिसिपालिटींत किंवा क्यान्टोन्मेंटांत किंवा इतर जागेंत गाड्यांच्या नियमनाबद्दल त्या त्या वेळीं कोणताही कायदा अमलांत असेल त्या म्युनिसिपालिटीच्या किंवा क्यान्टोन्मेन्टाच्या किंवा इतर जागेच्या हद्दींच्या आंत नेहेमी भाड्याकरितां फिरणाऱ्या गाड्यांस लागू होणार नाहीं.

स्थानिक सरकारास वगळण्याचा अधिकार.

२३. स्थानिक सरकारास, सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन, कोणत्याही गाड्या किंवा गाड्यांचा वर्ग या आक्टाच्या सर्व किंवा कोणत्याही ठरावांच्या अमलांतून वगळण्याचा अधिकार आहे."

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.